आंबेगाव तालुका विद्या विकास मंडळ संचालित,

# बी. डी. काळे महाविद्यालय, घोडेगाव,

ता. आंबेगाव, जि. पुणे

**वाणिज्य विभाग**

## शैक्षणिक वर्ष २०२४-२५

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

॥ यः क्रियावान् स पण्डितः ॥

दिनांक : २९/०४/२०२५

## वाणिज्य विभाग अहवाल

वाणिज्य विभागामार्फत या शैक्षणिक वर्षांमध्ये पुढील उपक्रम यशस्वीपणे राबविण्यात आलेले आहेत. त्याची सविस्तर माहिती पुढीलप्रमाणे देत आहोत.

- या शैक्षणिक वर्षांमध्ये महाविद्यालयांमध्ये एकूण एफ.वाय.बी.कॉम ५८ विद्यार्थी, एस.वाय.बी.कॉम ४९ विद्यार्थी, टी.वाय.बी.कॉम ५० विद्यार्थी, एम कॉम प्रथम वर्ष २५ तर एम कॉम द्वितीय वर्ष १० विद्यार्थी प्रवेशित होते. एस.वाय.बी.कॉम मधील ०२ विद्यार्थ्यांनी व्यावसायिक उद्योजकता तर ४७ विद्यार्थ्यांनी कॉस्टिंग विषय विशेष स्तरावर घेतले होते. टी..वाय.बी.कॉम मधील ०९ विद्यार्थ्यांनी व्यावसायिक उद्योजकता तर ४१ विद्यार्थ्यांनी कॉस्टिंग विषय विशेष स्तरावर घेतले होते.
- सहकार महर्षी दत्तात्रय गोविंदराव वळसे पाटील तालुकास्तरीय वक्तृत्व स्पर्धा दिनांक १४/०९/२०२४ रोजी मंचर या ठिकाणी पार पडली. या स्पर्धेत वाणिज्य विभागातील प्रथम वर्षातील विद्यार्थिनी कु.आदिती हरिश्चंद्र गावडे हिने प्रथम क्रमांक मिळविला.
- शैक्षणिक वर्ष २०१७ ते २०२० या Batch मधील विभागाचा माजी विद्यार्थी कु. पवन अरुण खंडागळे याने नोव्हेंबर २०२४ मध्ये झालेल्या चार्टड अकौंटट च्या अंतिम परीक्षेत यश संपादित केले. CA परीक्षा उत्तीर्ण होणारा पवन हा विभागातील दुसरा विद्यार्थी आहे. कठोर मेहनत व सातत्यपूर्ण अभ्यासाच्या जोरावर हे यश मिळवताना महाविद्यालयातील गुरुजनांचे बहुमोल सहकार्य लाभले ही कृतज्ञता पवनने व्यक्त केली.
- विभागातील प्राध्यापिका शितल बोऱ्हाडे यांनी दिनांक ३० डिसेंबर २०२४ रोजी पुणे विद्यापीठाची Business Administration या विषयात विद्यावाचस्पती (Ph.D) पदवी अर्जित केली. या निमित्ताने डॉ. बोऱ्हाडे एस. पी. यांचा संस्था महाविद्यालयाच्या वतीने सन्मान करण्यात आला.
- महाविद्यालयात नवीन प्रवेश घेतलेल्या प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रेरणा मिळावी व महाविद्यालयीन वातावरणाशी विद्यार्थी समरस व्हावेत या हेतूने वाणिज्य विभागातील द्वितीय व तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांतर्फे विभागातील सर्व प्राध्यापकांच्या मार्गदर्शनाखाली प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांचा स्वागत समारंभ १० जानेवारी २०२५ रोजी आयोजित करण्यात आला होता.
- शैक्षणिक अभ्यासक्रमाबरोबर इतर विषयात मुलांची कौशल्ये विकसित व्हावीत या हेतूने Choise Base Credit System अंतर्गत असणाऱ्या Short Term Course मध्ये विद्यार्थ्यांसाठी GST या Short Term Course चे ५ जानेवारी २०२५ ते २५ जानेवारी २०२५ या कालावधीत आयोजन करण्यात आले होते. या कोर्ससाठी विभातील सर्व प्राध्यापकांचे मार्गदर्शन लाभले. मंचर येथील श्री. निलेश फुलवडे यांनीही या कोर्स साठी बहिस्थ: अध्यापक म्हणून अध्यापन केले. हा कोर्स यशस्वीपणे पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देण्यात आले. या कोर्सचे समन्वयक म्हणून प्राध्यापिका शिंदे आर. एम. यांनी कामकाज पाहिले.
- महाविद्यालयामध्ये विद्यार्थ्यांना विशेष मार्गदर्शन करण्यासाठी काही तज्ञ व्यक्तींची व्याख्याने आयोजित केली होती. यामध्ये दिनांक २९/०१/२०२५ रोजी दिपाली खळदकर, (Sub- Broker,

Angel One) पुणे यांनी विद्यार्थ्यांना 'शेअर मार्केट' या विषयावर बहुमोल मार्गदर्शन केले. दिनांक ०५/०२/२०२५ रोजी निलया एजुकेशन ग्रुप, पुणे यांच्या वतीने महाविद्यालयात "Entrepreneurship Skills & Techniques" या विषयावर निलया एजुकेशन ग्रुपच्या सौ. ममता शाह यांनी बहुमोल मार्गदर्शन केले. या तज्ञ व्यक्तींची व्याख्याने महाविद्यालयात झाली यामुळे विद्यार्थ्यांना पुस्तकी ज्ञानाबरोबरच इतरही विषयांची माहिती प्राप्त झाली.

- शैक्षणिक कार्याबरोबरच विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळावा म्हणून आयोजित होत असलेल्या महाविद्यालयीन युवक महोत्सवामध्ये विभागातील विद्यार्थ्यांनी वैयक्तिक नृत्य, सामुहिक नृत्य, गीत गायन यात सक्रीय सहभाग नोंदवला. आनंद मेळाव्यात विभागातील विद्यार्थ्यांनी आपले Stall मांडले होते. वार्षिक क्रीडा महोत्सवात कबड्डी मध्ये मुलांच्या तृतीय वर्ष वाणिज्य संघाने विजेतेपद पटकावले तर मुलींचे सामुहिक विजेतेपद प्रथम वर्ष वाणिज्य वर्गास मिळाले. पुणे जिल्हा विभागीय क्रीडा स्पर्धांसाठी विभागातील प्रथम वर्षातील श्रावणी गाडेकर हिची कबड्डी संघात तर द्वितीय वर्ष वाणिज्य मधील साक्षी खंडे हिची क्रिकेट संघात निवड झाली.
- दिनांक ७ एप्रिल २०२५ रोजी प्रथम व द्वितीय वर्ष वाणिज्यच्या विद्यार्थ्यांनी तृतीय वर्ष वाणिज्यच्या विद्यार्थ्यांसाठी सदिच्छा समारंभाचे आयोजन केले. कमीत कमी कालावधीत उत्कृष्ट नियोजन व वेळेचे व्यवस्थापन करून विद्यार्थ्यांनी हा कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडला.

या विभागात अध्यापन करणारे माझे सहकारी डॉ. गव्हाळे सर, डॉ. काळे सर, प्रा. खरात सर, प्रा. पारधी सर , प्राध्यापिका डॉ.माणिक बोऱ्हाडे मॅडम, डॉ. शितल बोऱ्हाडे मॅडम, रेश्मा शिंदे मॅडम, रेखा कडाळे मॅडम यांचे सदैव मोलाचे सहकार्य लाभते. तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वाल्हेकर सर यांचेही वेळोवेळी मार्गदर्शन लाभले या सर्वांचा मी विभाग समन्वयक म्हणून आभारी आहे.

प्रा. सुर्यकांत चिंतामण कदम
वाणिज्य विभाग समन्वयक
बी.डी.काळे महाविद्यालय घोडेगाव